



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०२ ● अंक : २२१ ● पुणे ● मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा


15 | जुलै

आपल्या लेखणीने सामाजिक भान जागवले,
आपल्या नेतृत्वाने "आरंभ पर्व" ला नवा आयाम
दिला,आपली धडाडी, संयम आणि कर्तव्यनिष्ठा
आमच्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरते.

दै. आरंभ पर्वचे निवासी संपादक
आदरणीय श्री.

# लक्ष्मण साबळे सर

आपणांस उदंड
आयुष्याच्या
अनंत
शुभेच्छा..!



ईश्वर आपल्याला उत्तम
आरोग्य, आनंद आणि
यशाची सतत
साथ देवो हीच प्रार्थना.
आपला वाढदिवस नव्या
संकल्पांचा, नव्या
प्रेरणांचा पर्व ठरो!

शुभेच्छुक :

**मा.सौ. सुरेखा मते**
मुख्य संपादिका, पुणे

**मा.श्री.प्रतिक गंगणे**
व्यवस्थापकीय संपादक, पुणे

**मा.श्री.अभिषेक मरगळे**
मार्केटिंग हेड, पुणे

**मा.श्री.विश्वासराव आरोटे**
समूह संपादक



# मराठी अस्मितेला आव्हान कशाला?

भाषावार प्रांतरचनेनुसार, प्रत्येक राज्याची एक मातृभाषा आहे. महाराष्ट्रात मराठी, गुजरातमध्ये गुजराती, कर्नाटकात कन्नड, पंजाबमध्ये पंजाबी मातृभाषा आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या शिक्षणातील सक्तीवरून जो वाद निर्माण झाला आहे, त्याच्या खोलामध्ये न जाता महाराष्ट्राबाहेर गायपट्ट्यात मराठी माणूस, मराठी अस्मितेला ठेच पोहोचविण्याचे प्रकार गैरसमजुतीने होत आहेत, त्याचा निषेध व्हायलाच हवा; पण महाराष्ट्रातील जनतेने राज्यातील सरकारची याबाबतीतली भूमिकाही समजून घ्यायला हवी.

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी करताना तिसरी भाषा म्हणून हिंदीसह अन्य भाषांचा शासन निर्णय राज्य सरकारने काढला होता. पहिलीपासून शिकणाऱ्या मुलांसाठी मराठी भाषेसोबत इंग्रजी आणि हिंदीसह अन्य तिसऱ्या भाषेचा पर्याय होता. मराठी भाषिकांच्या संघटनांकडून झालेल्या विरोधानंतर महाराष्ट्रात भाषेवरून वाद नको म्हणून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने घेतला.

नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखालील समिती नेमून भाषेच्या तिसऱ्या पर्यायाबाबत अभ्यास करून सरकारला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे महायुती सरकारने जनभावनेचा आदर बाळगून, हिंदीसह अन्य तिसऱ्या भाषेचा पर्याय असावा की नसावा, यावरचा निर्णय समितीवर सोपविला आहे. त्यानंतर खरं तर या वादावर पडदा पडायला हवा होता; परंतु महाराष्ट्राबाहेरील निशिकांत दुबे या खासदाराने समस्त मराठी माणसांबद्दल काढलेल्या विधानाचे पडसाद महाराष्ट्रात उमटले. ‘मराठी लोक आमच्या पैशांवर जगतात, तुमच्याकडे आहे काय?’ असे वादग्रस्त विधान खासदार दुबे यांनी केले. महाराष्ट्र भाजपाच्या नेत्यांनी दुबे यांच्या विधानांचा निषेध केला आहेच ही बाब तितकीच अधोरेखित करण्यासारखी आहे.

पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही



अशी विधाने करणे योग्य नाही, कारण त्यातून निघणारा अर्थ लोकांच्या मनात गोंधळ निर्माण करतो, अशी स्पष्ट भूमिका मांडली. महाराष्ट्र आणि मराठीच्या पराक्रमाची साक्ष जगभर आहे. झारखंडच्या खासदाराने कायद्यात बसणारी भूमिका जरूर मांडावी, पण मराठी माणसाच्या कर्तृत्वावर, कर्तबगारीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू नये, अशा शब्दांत सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी महाराष्ट्र सरकारची भूमिका विधानसभेत मांडत दुबे यांच्या टीकेला चोख प्रत्युत्तर दिले. आता महाराष्ट्र, मराठी माणूस यांची भूमिका अन्य प्रांतात राहणाऱ्या हिंदी भाषिकांनी समजून घेतली पाहिजे.

हिंदी भाषेला विरोध नाही तर शिक्षणात पहिलीपासून हिंदीचा आग्रह नको, अशी मराठी भाषिकांची साधी सोपी मागणी असताना, दुबे यांच्यासारख्या झारखंडमध्ये राहणाऱ्या लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का पोहोचेल, अशी विधाने का बरे करावीत? त्याचा उलट त्रास महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे गुण्यागोविंदाने राहणाऱ्या अमराठी माणसांनाच होण्याची शक्यता आहे. त्यांच्यात दरी निर्माण करण्याचे काम अशी वादग्रस्त विधाने करून कशासाठी करायची. केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रांची अंमलबजावणी करण्याचे फर्मान राज्य सरकारने काढले असले, तरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जाहीर केलेल्या या संदर्भातील भूमिकेनंतर भविष्यात केंद्र सरकारला या निर्णयावर किती फोकस करायचा, हे आगामी काळात कदाचित ठरवावे लागेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रवक्ते सुनील आंबेकर यांनी स्पष्ट केले आहे की, “राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची खूप आधीपासूनची भूमिका आहे की, भारतातील सर्व भाषा या राष्ट्रीय भाषा आहेत.

देशातील वेगवेगळ्या भागात राहणारे लोक तिथली भाषा, आपापली मातृभाषा बोलतात. त्यामुळे मुलांना प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतच मिळालं पाहिजे असा आग्रह असतो. मातृभाषेत शिक्षण ही गोष्ट खूप आधीपासूनच ठरलेली आहे.” आंबेकर यांच्या भूमिकेनंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकार काय निर्णय घेणार हे प्रशासकीय पातळीवर दिसून येईल; परंतु ‘मराठी लोक कोणाची भाकर खात आहेत? आमच्या पैशांवर तुम्ही मराठी लोक जगताय. मराठी लोकांकडे कोणते उद्योग आहेत? मराठी लोक किती टॅक्स देतात सांगा,’ अशी दुबे यांची बेताल वक्तव्ये मराठी भाषेशी नव्हे, तर अस्मितेला ठेच पोहोचविणारी आहेत.

देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचे सर्वाधिक योगदान आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठी माणसांचे ऐतिहासिक योगदान आहेच, पण गेल्या चारशे वर्षांत परकीय आक्रमकांनी भारताची संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांनी भारताची संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम केले, हे कोणीही विसरू शकणार नाही. ‘मेरी झाँसी नहीं दूँगी,’ असे इंग्रजांना ठणकावून सांगणारी झाँसीची राणी लक्ष्मीबाई मराठीच होत्या ना? हिंदी प्रदेशात राज्य चालविताना, त्यांनी स्थानिक भाषिकांवर कधी अन्याय केला नाही. मुगल राजवटीत हिंदू मंदिरे नेस्तानाबूत करण्यात येत होती, तेव्हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी उत्तर प्रदेशातील काशी विश्वेश्वरच्या मंदिरापासून मध्य प्रदेशातील उज्जैन महाकाल मंदिरांचा जीर्णोद्धार करून, हिंदू समाजाची धार्मिक अधिष्ठाने जपण्याचा प्रयत्न केला.

# कोरेगावमुळ ग्रामपंचायत पाहते अपघाताची वाट

## ग्रामपंचायत अकार्यक्षम असल्याचे घोषित केल्यास आम्ही हा खांब काढु - प्रमोद बोधे

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पुणे - सोलापूर महामार्गालगत कोरेगावमुळ ग्रामपंचायतीचे प्रवेश द्वार असून तिथे स्वागत कमान उभी करण्यात आली आहे .परंतु २६ जुन २०२५ रोजी अज्ञात वाहनाने या कमानीला धडक दिली . त्या मध्ये कमानीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन सिमेंटचा खांब मोडकळीस आला .ग्रामपंचायतीने खांबावरील आडवे टाकलेले लोखंडी अँगल काढले .परंतु सिमेंटचा तुटलेला खांब काढण्याचे कष्ट घेतले नाही . या कमानीचा सिमेंट खांब मोडकळीस आला असुन भविष्यात होणाऱ्या दुर्घटनेस कोरेगावमुळ ग्रामपंचायत अपघाताची वाट पाहतेय का ? अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे . यामुळे ग्रामपंचायतीचा ढिसाळ कारभार दिसत आहे .ग्रामपंचायत येथून जाणाऱ्या नागरिकांच्या जीवाशी खेळत असुन सरपंच लाला बोधे हे येथून जातात पण खांब काढण्याकडे दुर्लक्ष करत आहेत .तर ग्रामपंचायत सदस्य फक्त राजकारणासाठी पदे भोगत असुन समाजाचे काहीही घेणे देणे नसल्याच्या



अविर्भावातून येथून जा ये करतात.

त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर कुणाचा वचक राहिला नाही. कोरेगाव मूळ ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातून राज्यमार्ग क्र.११७ जात असून मोडकळीस आलेल्या प्रवेशद्वार कमानीच्या सिमेंट खांबाची अवस्था वाईट झाली असून कोणत्याही क्षणी हा खांब कोसळू शकतो. त्यामुळे येथून प्रयागधाम हॉस्पिटल कडे जाणारे पेशंट, शाळेत जाणाऱ्या स्कूल बस, पायी चालणारे प्रवासी तसेच सर्व वाहन धारक यांना मोडकळीस आलेला खांबाचा धोका निर्माण झालेला आहे. कोरेगाव मूळ ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य या तुटलेल्या प्रवेश कामानी पासून दररोज जा ये करतात तरीदेखील मोडकळीस आलेल्या खांबाकडे जाणीवपूर्वक ग्रामपंचायतीचे पदाधिकारी दुर्लक्ष का करतात ?

**इथुन ग्रामपंचायतीचे सरपंच ,सदस्य व इतर पदाधिकारी दररोज जा ये करतात परंतु ग्रामपंचायतीचे पुर्ण पणे दुलक्ष झाले असून ग्रामपंचायत काय कमानीचा खांब पडण्याची व अपघात होण्याची वाट पाहते का .? लवकरात लवकर हा खांब ग्रामपंचायतीने काढून टाकावा अन्यथा आम्ही ग्रामपंचायतीच्या विरोधात आंदोलन करुन ग्रामपंचायत अकार्यक्षम असल्याचे घोषित करून आम्ही हा खांब काढुन टाकु .**
**- प्रमोद बोधे माजी सरपंच कोरेगावमुळ**

असा एक मोठा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे. या मोडकळीस आलेल्या खांबामुळे भविष्यात दुर्घटना होण्याची शक्यता असुन ग्रामपंचायतीने लवकरात लवकर मोडकळीस आलेला सिमेंट खांब काढून पुढील धोका टाळावा अशी नागरिकांनी मागणी केली आहे.



# धर्माभिमानी पुण्याचा हुंकार! हिंदू समाजाचा जाहीर निषेध मोर्चा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सांगलीतील ऋतुजा पाटील या धर्माभिमानी मुलीला ख्रिश्चन धर्मातल्या राजगे कुटुंबीयांनी हिंदू असल्याचे भासवून लग्न केले. विवाहानंतर चर्चमधील फादरच्या सांगण्यावरून तिच्यावर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी प्रचंड मानसिक छळ झाला. सात महिन्यांची गरोदर असताना या छळाला कंटाळून ऋतुजाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

या दुर्दैवी आणि संतापजनक घटनेच्या विरोधात पुण्यात दिनांक ८ जुलै रोजी हिंदू समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

या मोर्चात अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला.धर्मांतरास आळा बसावा यासाठी कठोर कायदा व्हावा तसेच दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

# थोडक्यात



## वैष्णव ठाकूरची वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी निवड


**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याची नॉर्वे येथे होणाऱ्या वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली असून तो भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. पतियाळा, पंजाब येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये वैष्णवने ११० किलो वजनी गटात १६० किलो स्नॅच आणि १९२ किलो क्लीन अँड जर्क केला आहे. स्नॅच व क्लीन अँड जर्क दोन्हीचे मिळून असणारे ३३३ किलोचे पात्रता मानक पूर्ण केल्यामुळे वैष्णवची ऑक्टोबर २०२५ मध्ये नॉर्वे येथे होणाऱ्या वर्ल्ड वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपकरिता निवड झाली आहे. वैष्णवच्या या दैदीप्यमान यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे यांच्या हस्ते सत्कार करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी क्रीडा विभागातील सर्व प्राध्यापक व वेटलिफ्टिंग खेळाडू उपस्थित होते.**

## नोटीस न देता जमीन सातबाऱ्यावरून गायब; दलित सेनेचे आंदोलन



**पुणे (आरंभ पर्व) : महसुली अधिकारी यांनी जमिनीच्या क्षेत्रातील काही क्षेत्र नोटीस न देता वजा केल्याचा प्रकार आहे .त्याच्या निषेधार्थ दलित सेनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी आंदोलन केले होते याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. मुळशी तालुक्यातील नांदे गावातील दलित सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुनील यादव यांच्या नावे असलेल्या जमिनीचे काही क्षेत्र मुळशी तहसीलदार तलाठी यांनी नोटीसन बजावता वजा केल्याचे निवेदनात दिले आहे. यावेळी वरिष्ठ अधिकारी कडून वेळोवेळी आश्वासन देऊन ही संबंधित अधिकारीवर कारवाई होत नसल्याचे म्हणणं आंदोलन करत असलेल्या नागरिकांनी व्यक्त केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणास न्याय द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रशांत जगताप, सुनील यादव निलेशभाऊ दमिष्टे,मा.जिल्हा परिषद सदस्या सुरेखाताई दमिष्टे, माजी सभापती प्रभावती ताई भुमकर, आपचे धनंजय बेनकर सुहास शेठ हगवणे, राजेश पोकळे,सनी रायकर,गौरव शिंदे ,दिनाभाऊ ,अमर आखाडे ,रवी देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान पाच वर्षे जुन्या तलाठी यांनी केलेल्या नोंदी व तहसीलदार प्रांताधिकारी यांनी दिलेल्या आदेश यांचीही तपासणी होणार आहे सदर कुटुंबाला तात्काळ न्याय मिळावा अशी विनंती या आंदोलनाच्या निमित्त करण्यात आली. यावर लवकर न निर्णय घेतल्यास उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. सदर प्रकरणात तलाठी सर्कल तहसीलदार प्रांत तसेच ॲडिशनल कलेक्टर सुहास मापारी हे दोषी असल्याचा आरोप करत यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.**

# श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटेपासूनच गर्दी



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

आषाढ महिन्यातील संकष्टी चतुर्थी साठी भाविकांनी श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटे पासून गर्दी केली होती. पहाटे पुजारी आगलावे बंधु यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली यावेळी विश्वस्त केशव विद्वांस उपस्थित होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगण आणि मंदिराबाहेर मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. चिंचवड देवस्थान ट्रस्ट आणि तर्पण ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या प्रमाणात शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान करण्याचे श्रेष्ठ कार्य केले. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ. प.पांडुरंग (महाराज) काळे, आळंदी यांचे सुश्राव्य कीर्तन झाले .चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था करण्यात केली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

## हवेली तालुक्यातील सरपंच आरक्षणामध्ये

# 'कहीं खुशी, कहीं गम' असे वातावरण

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणाची सोडत शुक्रवारी (११ जुलै) रोजी काढण्यात आली. काहींच्या मनासारखं तर काहींच्या मनाविरुद्ध आरक्षण पडल्याने 'कहीं खुशी, कहीं गम' असे वातावरण पाहावयास मिळाले. हवेली तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले.

हवेली तालुक्याचे तहसीलदार किरण सुरवसे, यांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पाच वर्षांसाठी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण ठरले. आरक्षण सोडत काढताना गावागावांतील अनेक इच्छुक मंडळी उपस्थित होती. यात आरक्षणाचा फटका बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली, तर पूरक




आरक्षणामुळे सरपंचपदाची संधी मिळण्याच्या आशेमुळे बरेच इच्छुक आजपासूनच कामाला लागले आहेत. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आणि तालुक्यातील बड्या राजकीय नेत्यांशी संबंधित असलेल्या गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यात काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. तर काही जणांच्या आशेवर पाणी फेरले गेल्याचे दिसून आले.

सर्वसाधारण गटामध्ये असलेली गावे - फुलगाव, वडगांव शिंदे, अहिरे, खानापुर, बकोरी, बिवरी, तुळापुर, पिंपरी सांडस, वाडेबोल्हाई, बहुली, मालखेड, डोणजे, गोऱ्हे खुर्द, सोनापुर, शिरसवडी, बुर्केगाव, पेरणे, लोणीकंद, अष्टापुर, सांगरूण.

सर्वसाधारण महिला गटामध्ये असलेली गावे - कल्याण, मांजरी खुर्द, घेरासिंहगड, आळंदी म्हातोबाची, लोणी काळभोर, तरडे, भवरापूर, उरुळी कांचन, खडकवाडी, आर्वी, गाऊडदरा, श्रीरामनगर, थेऊर, कोलवडी साष्टे, न्हावी सांडस, कुंजीरवाडी, आव्हाळवाडी, सांगवी सांडस, मांडवी बुद्रक व वढू खुर्द.

नागरिकांचा मागास प्रवर्ग गटामध्ये असलेली गावे. : निरगुडी, मांडवी खुर्द, शिंदवणे, सोरतापवाडी, गोहे बुद्रुक, भावडी, डोंगरगाव, खामगाव टेक, गोगलवाडी.

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला गटामध्ये असलेली गावे. - वळती, वडकी, जांभळी, आंबी, पेठ, मणेरवाडी, शिवापूर, नायगाव, कोंढणपूर, कुडजे.

अनुसूचित जाती गटामध्ये असलेली गावे. - खामगाव मावळ, कोरेगाव मूळ, टिळेकरवाडी, राहाटवडे, केसनंद.

अनुसूचित जाती महिला गटामध्ये असलेली गावे. -

आगळंबे, खेड शिवापूर, हिंगणगाव, कदमवाकवस्ती, प्रयागधाम. अनुसूचित जमाती गटामध्ये असलेले गाव. - वरदाडे

अनुसूचित जमाती महिला गटामध्ये असलेले गाव. -शिंदेवाडी.

# मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील वेश्याव्यवसायावर धडक कारवाई; परराज्यातील मुलींची सुटका

## एजंट महिला व तिघे अटकेत; भूपेंद्र मोरे यांच्या आंदोलनाला यश; पुणे गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाची प्रभावी मोहीम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरात मुंबई-बेंगळुरू महामार्गाच्या आसपास झपाट्याने वाढत असलेल्या वेश्या व्यवसायावर अखेर पोलिसांनी मोठी धडक कारवाई करत लगाम घातला आहे. पुणे गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथक क्र. १ ने हॉटेल ग्रँड व्ह्यू इन, न्यू एचडीएफसी बँकजवळ, नऱ्हे परिसरात कारवाई करून परराज्यातील मुलींची सुटका केली. यामध्ये वेश्या व्यवसाय चालवणारी मुख्य महिला एजंट सपना उर्फ लक्ष्मी कदम आणि तिचे तीन साथीदारांना अटक करण्यात आली आहे.

दिनांक ७ जुलै रोजी, पुणे शहरात पेट्रोलिंग करत असताना पोलिस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, सपना कदम नावाची महिला एजंट वेश्यागमनासाठी मुलींचे फोटो ग्राहकांना पाठवून व्यवहार करते. ग्राहकांच्या मागणीनुसार ठराविक हॉटेलमध्ये मुली पोहोचवून प्रत्येकी ४,००० रुपये वसूल केले जातात.

सदर एजंट सिंहगड रोड परिसरातील हॉटेल ग्रँड व्ह्यू इनमध्ये वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे स्पष्ट झाल्यावर, पोलिसांनी तत्काळ छापा टाकून मुलींची सुटका केली. या मुली विविध राज्यांमधून (उत्तर भारत, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल इत्यादी) आणल्या गेल्या होत्या.

सपना उर्फ लक्ष्मी कदम (रा. खडकी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद) हिला अटक करून तिच्या तीन साथीदारांविरुद्ध सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 341/2025 नोंदवला आहे. गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा 1956 (PITA) च्या कलम ३, ४, ५ अंतर्गत दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलीस आयुक्त रंजन शर्मा, पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, आणि अति. पोलीस आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईतील प्रमुख अधिकारी व कर्मचारी : पोलीस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, प्रवीण उत्तेकर, विनायक साळवे, सचिन माळवे, संदीप शिर्के, विपुल गायकवाड, सुहास डोंगरे, दयानंद तेलंगे, सतीश काकडे, दत्ताराम जाधव, स्वप्निल मिसळ

गेल्या महिन्यात सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी नवले ब्रिज परिसरातील वेश्या व्यवसाय आणि गुन्हेगारीविरोधात चक्काजाम आंदोलन केले होते. त्यांनी यासंदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे यांना निवेदन दिले होते. त्यानंतर हे निवेदन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे वर्ग करण्यात आले. त्याच आठवड्यात कारवाई केल्याने भूपेंद्र मोरे यांच्या प्रयत्नांना यश आल्याचे स्पष्ट झाले आहे.




# ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे.

## खुली फेरनिविदा सूचना क्र.- १/२०२५-२०२६

ग्रामपंचायत मौजे पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि.पुणे यांच्यातर्फे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून दोन पाकीट सीलबंद लिफाफा पद्धतीने खालील कामांची फेरनिविदा मागविण्यात येत आहे.


कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव तर्फे खेड येथे दि. १५/०७/२०२५ ते दि. २१/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ०५ या वेळेत देण्यात येतील. व कंत्राटदार यांच्याकडून पाठवण्यात आलेल्या सीलबंद निविदा दि. १५/०७/२०२५ ते दि. २१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा पिंपळगाव तर्फे खेड ग्रामपंचायतीच्या पुढील मासिक सभेमध्ये उघडण्यात येतील.


| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी रूपये | कामाचा कालावधी | निधीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळगाव तर्फे खेड अंतर्गत पोतलेमळा येथील बोअर पंप यंत्रणा शेड दुरूस्ती करणे. | १०४९७४/- | १% (रूपये १३००/-) | ५९०/- | दोन महिने | १५वा वित्त आयोग |
| २ | पिंपळगाव तर्फे खेड येथील ग्रामअभ्यासिकेस फर्निचर साहित्य तयार करणे. | २५५९९२/- | १% (रूपये ३३००/-) | ५९०/- | दोन महिने | १५वा वित्त आयोग |
| ३ | पिंपळगाव तर्फे खेड येथील प्राथमिक शाळेस कलर करणे. | १०५४३९/- | १% (रूपये १३००/-) | ५९०/- | दोन महिने | १५वा वित्त आयोग |
| ४ | पिंपळगाव तर्फे खेड येथील ८ अंगणवाडी केंद्रास बालस्नेही कॉर्नर तयार करणे. | ३१९८२५/- | १% (रूपये ३८००/-) | ५९०/- | दोन महिने | १५वा वित्त आयोग |

टीप : १) कोऱ्या निविदा नमुन्याची प्रत ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि.पुणे येथील कार्यालयात फी भरून निविदा उपलब्ध करून घ्यावी.२) ठेकेदाराने कोऱ्या निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ३) ठेकेदार यांनी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, तीन वर्षांचे इन्कमटॅक्स रिटर्न (२०२२/२३,२०२३/२४ व २०२४/२५) , जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव दाखला दस्तऐवज लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) मध्ये जोडणे आवश्यक / बंधनकारक आहे. लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) मध्ये आवश्यक दस्तऐवजाची सूची नसलेस लिफाफा क्रमांक २ (आर्थिक / व्यापारी लिफाफा) उघडला जाणार आहे. लिफाफा क्रमांक २ मध्ये वरील कामाचा १% इसारा रकमेचा वरीलप्रमाणे धनाकर्ष अथवा धनादेश ग्रामपंचायत शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे चे नावाने जोडणे आवश्यक आहे. ४) कोऱ्या निविदा तांत्रिक लिफाफ्यामध्ये द्यावयाचा तपशील निविदा खरेदी सोबत द्यावयाचा आहे. ५) सदरचे कामाबाबत मा. उपअभियंता पाणीपुरवठा, जिल्हा परिषद पुणे, उपविभाग पंचायत समिती खेड, पुणे यांचे सूचना बंधनकारक राहतील.६) कोणतेही कारण न देता कोणतीही एक निविदा अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार हक्क ग्रामपंचायत पिंपळगाव तर्फे खेड, ता. खेड, जि. पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत गोसासी, ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत गोसासी, ता. खेड, जि. पुणे














# पत्रकारीतेतील कर्तव्यदक्षतेचा आरंभ
# मा. श्री. लक्ष्मण साबळे (सर)

आजचा दिवस केवळ एक वाढदिवस नाही, तर ती एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या जीवनप्रवासाची गौरवमयी आठवण आहे – दै. आरंभ पर्वचे धडाडीचे, कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील निवासी संपादक **मा. श्री. लक्ष्मण साबळे सर यांचा आज जन्मदिवस.**

पत्रकारिता ही केवळ बातम्या छापण्याची बाब नसते, तर ती समाजाच्या नाडीवर बोट ठेवण्याची जबाबदारी असते. साबळे सरांनी ही जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि निर्भीडपणे पार पाडली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली 'आरंभ पर्व'ने पत्रकारितेचा एक आदर्श निर्माण केला आहे - असा आदर्श जो लोकहितासाठी, समाजहितासाठी आणि सत्याच्या पाठीशी उभा राहतो.

## धडाडीची वाटचाल

साबळे सरांचे लेख असोत, बातम्यांचे मांडणी असो वा संपादकीय लिखाण – त्यांच्या प्रत्येक शब्दातून एक स्पष्ट विचार, सामाजिक बांधिलकी आणि सत्याला अनुसरून वाटचाल यांचा प्रत्यय येतो. चुकीच्या गोष्टींवर नेमके बोट ठेवणे आणि योग्य बाबींना योग्य मंच मिळवून देणे हा त्यांच्या कार्याचा गाभा आहे. ते केवळ एक संपादक नाहीत, तर ते एक विचारवंत, मार्गदर्शक आणि सामाजिक भान राखणारे सजग नागरिक आहेत. अनेक नवोदित पत्रकारांसाठी ते आदर्श पत्रकार आणि प्रेरणास्थान आहेत.

## कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकीचा मिलाफ

साबळे सरांचे व्यक्तिमत्त्व जितके सुसंगत आणि ठाम आहे, तितकेच ते हृदयात माणुसकी जपणारे आहे. आपल्या कार्याच्या निमित्ताने समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचा आणि त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा त्यांनी सदैव प्रयत्न केला आहे. त्यांच्या सडेतोड शैलीत सत्य सांगण्याची हिंमत आहे, पण त्याचवेळी त्यांच्यात समजूतदारपणा आणि सौम्यता देखील आहे.गोष्टींवर नेमके बोट ठेवणे आणि योग्य बाबींना योग्य मंच मिळवून देणे हा त्यांच्या कार्याचा गाभा आहे.

## नवे पर्व, नव्या संकल्पांसोबत

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना, 'आरंभ पर्व' चा प्रत्येक सदस्य, वाचक, आणि हितचिंतक त्यांचे कौतुक करतो."
त्यांचे आरोग्य उत्तम राहो, त्यांचे मार्गदर्शन आम्हाला सतत लाभो, आणि पत्रकारितेतील त्यांच्या संकल्पांना नवा आयाम मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.नागरिक आहेत. अनेक नवोदित पत्रकारांसाठी ते आदर्श पत्रकार आणि प्रेरणास्थान आहेत.



## मा. श्री. लक्ष्मण साबळे सर

आपल्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!
आपला प्रवास सदैव तेजस्वी राहो!
– 'आरंभ पर्व' परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!

सनराईज ग्राफिक्स : 8379928399

**शब्दांकन : मा. श्री. प्रतिक गंगणे – व्यवस्थापकीय संपादक, पुणे**
**संकलन : मा. श्री. अभिषेक मरगळे – मार्केटिंग हेड, पुणे**

**शुभेच्छुक : मा. श्री. विश्वासराव आरोटे - समूह संपादक**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.